सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!


https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २३६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. २० आक्टोंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## लालूंच्या राजदची यादी आली! काँग्रेसविरोधात तीन जागांवर दिले उमेदवार तेजस्वी यादव राघोपूरमधून लढणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०पटना**

बिहार विधानसभा निवडणुकीसाठी सत्ताधारी आघाडीने आपले उमेदवार जाहीर केले असताना आता विरोधकांकडूनही उमेदवार यादी जाहीर झाली आहे. काँग्रेसच्या यादीनंतर लालू प्रसाद यांच्या राष्ट्रीय जनता दलाने पहिल्या टप्प्यासाठी १४३ उमेदवारांची अधिकृत यादी जाहीर केली आहे. यामध्ये तेजस्वी यादव यांना पारंपरिक मतदारसंघ असलेल्या राघोपूरमधून तिकीट देण्यात आले आहे.



अर्ज भरण्याच्या अंतिम दिवशी आज ही यादी जाहीर करण्यात आली आहे. यामुळे काही उमेदवारांची पुरती धावपळ उडणार आहे. महाआघाडीत जागावाटपावरून सुरू असलेल्या वादामुळे ठगऊने ही यादी उशिरा जाहीर केली, मात्र यापूर्वीच उमेदवारांना फॉर्म बी वाटप करण्यात आले होते. यामुळे काही उमेदवारांना दिलासा मिळाला असला तरी ज्यांची उमेदवारी बदलण्यात आली त्यांना धावपळ करावी लागणार आहे.

या उमेदवार यादीनंतर काँग्रेस आणि राजद तीन जागांवर एकमेकांविरोधात उभे ठाकल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. वैशालीमध्ये काँग्रेसचे उमेदवार अजय कुशवाह आणि राजदचे उमेदवार संजीव कुमार यांच्यात सामना होत आहे. लालगंजमध्ये काँग्रेस उमेदवार आदित्य कुमार आणि राजद उमेदवार शिवानी शुक्ला, सिकंदरामध्ये काँग्रेस उमेदवार विनोद चौधरी आणि राजद उमेदवार उदय नारायण चौधरी यांच्यात लढत होणार आहे.

**प्रमुख उमेदवारांची नावे**

तेजस्वी यादव : ठगऊचा सर्वात मोठा चेहरा असलेले तेजस्वी यादव त्यांच्या पारंपरिक राघोपूर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहेत.

वीणा देवी : बाहुबली नेते सूरजभान सिंह यांच्या पत्नी वीणा देवी यांना महत्त्वाच्या मोकामा मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे.

चंद्रशेखर : त्यांना मधेपुरा मतदारसंघातून तिकीट मिळाले आहे.

उदय नारायण चौधरी : ज्येष्ठ नेते उदय नारायण चौधरी हे झाझा विधानसभा मतदारसंघातून रिंगणात उतरले आहेत.

## बिहारमध्ये इंडिया आघाडीत फूट? जागावाटप अन् मुख्यमंत्री चेहऱ्यावरून काँग्रेस-आरजेडीत घमासान

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०पटना**

विरोधी पक्षाच्या इंडिया आघाडीत फूट पडण्याची चिन्हे दिसत आहेत. ज्या बिहारमधून इंडिया आघाडीची सुरुवात झाली तिथेच ही आघाडी विखुरताना दिसत आहे. बिहारच्या पटना येथे २३ जून २०२३ साली नितीश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली विरोधकांची पहिली बैठक झाली होती. मात्र आज २ वर्षांच्या कमी काळातच नितीश कुमार एनडीएत परतले आणि बिहारमध्ये भाजपाविरोधात जी एकजूट तयार करण्यात आली होती. ती इंडिया आघाडीही तुटण्याच्या मार्गावर आहे.

इंडिया आघाडीने २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत २३४ जागांवर विजय मिळवत त्यांची ताकद दाखवून दिली. परंतु त्यानंतर झालेल्या महाराष्ट्र, हरियाणा आणि दिल्लीसारख्या निवडणुकीत विरोधकांच्या आघाडीला शह मिळाला. तृणमूलसोबत आघाडीचे नेतृत्व कोण करणार यावरून झालेला संघर्ष असेल किंवा दिल्ली निवडणुकीत आपसोबत फिस्कटलेली चर्चा असेल, आता काँग्रेस आरजेडीसोबत जागावाटप आणि मुख्यमंत्रिपदाच्या चेहऱ्यावरून वादात सापडली आहे. बिहारमध्ये अनिश्चितता असताना शेजारील झारखंड राज्यातही झटका लागला आहे. याठिकाणी जेएमएमसोबत आघाडीवर पुन्हा विचार सुरू आहे. त्यामुळे इंडिया आघाडीचा प्रवास इथेच संपणार का असा प्रश्न उपस्थित झाला आहे.



बिहारमध्ये आरजेडी आणि काँग्रेस यांच्यात जागावाटपावरून रस्सीखेच सुरू आहे. मतदानाच्या पहिल्या टप्प्यातील उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया संपल्यानंतरही अद्याप जागा वाटपाचा फॉर्म्युला ठरला नाही. त्यामुळे महाआघाडीत अनेक जागांवर एकमेकांविरोधात उमेदवार उतरवण्यात आले आहेत. वैशाली, लालगंज, कहलगाव, बिहारशरीफसारख्या ठिकाणी आरजेडी आणि काँग्रेस यांच्यात थेट सामना आहे तर बछवाडा, रोसरा येथे सीपीआयची काँग्रेससोबत लढत आहे. दुसरीकडे आरजेडी नेते मृत्यूंजय तिवारी यांना अजूनही महाआघाडीतील मतभेद संपुष्टात येण्याचा विश्वास आहे. आरजेडी केवळ बिहार, झारखंडमध्ये निवडणूक लढते. आम्ही काँग्रेसकडून कर्नाटक, राजस्थान, मध्य प्रदेशातील जागांची मागणी केली नाही. त्यामुळे काँग्रेसने राज्यातील परिस्थिती समजून घ्यावी असं त्यांनी सांगितले. दरम्यान, तेजस्वी यादव यांना महाआघाडीचा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा घोषित करावा अशी मागणी आरजेडी नेते करत आहेत. काँग्रेसने अद्याप हा प्रस्ताव मान्य केला नाही. बिहारमध्ये काँग्रेसचे काही नेते खासगीरित्या यादव यांना पसंत करतात परंतु पक्षाचे केंद्रीय नेतृत्व यावर काहीही बोलण्यास तयार नाही. जर आरजेडीचा प्रस्ताव मान्य केला तर अशा मतदारांवर प्रभाव पडेल जे अद्यापही लालूप्रसाद यादव यांच्या जंगल राजला घाबरतात. मात्र महाआघाडीत सर्व काही ठीक असून केवळ घोषणा बाकी आहे जी योग्य वेळी केली जाईल असं काँग्रेस नेते पवन खेडा यांनी म्हटलं.

## सुधारित पंचनामे पूर्ण, आकडा वाढला

### अमरावतीसह पाच जिल्ह्यांना विशेष बाब म्हणून मिळणार अतिरिक्त मदत

अरुण जोशी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अमरावती**

राज्यात सप्टेंबरमध्ये झालेल्या अतिवृष्टीचे नुकसान मोजण्यासाठी तब्बल १७ दिवसांचा कालावधी लागला आहे.महसूल, कृषी व ग्रामविकास विभागाने केलेल्या पंचनाम्यानुसार ३४ जिल्ह्यांपैकी वर्धा, यवतमाळ, अमरावती, अहिल्यानगर, धुळे व नाशिक या सहा जिल्ह्यांमध्ये राज्य सरकारने जाहीर केलेल्या निकषांपूर्वीच पंचनामे पूर्ण करण्यात आले होते.




**सुधारित आकडेवारी**

एकूण बाधित क्षेत्र : ६८,१३,२४२
एकूण बाधित जिल्हे : ३४
एकूण बाधित शेतकरी : ८३,१२,९७०
भरपाई ७०,०९८ कोटी ६८ लाख २१ हजार

**राज्यातील सहा जिल्ह्यांसाठी विशेष बाब**

राज्यात मराठवाडा आणि विदर्भातील अनेक जिल्ह्यात अतिवृष्टीने पीकांचे नुकसान झाले. त्यातील सहा जिल्ह्यांमध्ये मदतीचे निकष जाहीर करण्यापूर्वीच पंचनामे झाले होते. त्यामुळे या सहा जिल्ह्यांसाठी सरकारने नव्याने पंचनामे पूर्ण करताना विशेष बाब म्हणून २ हेक्टरची मर्यादा ३ हेक्टरपर्यंत केली आहे.

त्यामुळे या सहा जिल्ह्यांमध्ये नव्याने पंचनामे पूर्ण करताना विशेष बाब म्हणून दोन हेक्टरची मर्यादा तीन हेक्टरवर करण्यात आली.

त्यानुसार सुमारे ७ लाख २ हजार १९ हेक्टरचे क्षेत्र वाढले आहे. राज्यात गुरुवारअखेर ६१ लाख ११ हजार २२३ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाल्याचे सांगण्यात आले होते.

आता त्यात या ७ लाख २ हजार १९ हेक्टरचे क्षेत्र अंतर्भूत करण्यात आल्यानंतर एकूण नुकसानीचे क्षेत्र ६८ लाख १३ हजार २४२ हेक्टर इतके झाले आहे. या नुकसानीमुळे राज्यातील ८३ लाख १२ हजार ९७० शेतकऱ्यांना तडाखा बसला आहे.या पंचनाम्यांनुसार राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीअंतर्गत शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यासाठी राज्य सरकारकडे ७ हजार ९८ कोटी ६८ लाख २१ हजार रुपयांची मागणी करण्यात आली आहे.आता राज्याचा मदत व पुनर्वसन विभाग यासंदर्भात शासन निर्णय जारी करून शेतकऱ्यांना मदत थेट खात्यावर जमा करणार आहे.

## आगामी निवडणुका २७ टक्के आरक्षणानुसारच होणार : मुख्यमंत्री फडणवीस

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०नागपूर**

सर्वोच्च न्यायालयात ठाकरे सरकारने योग्य बाजू मांडली नाही. यामुळे निवडणु जेत ओबीसींचे आरक्षण गेले. हे एकप्रकारे ओबीसींना राजकारणातून वंचित ठेवण्याचे षडयंत्र होते. मात्र, आम्ही न्यायत्र्यात ओबीसींची भक्कमपणे बाजू मांडली. संपुष्टात आलेले २७ टक्के आरक्षण पुन्हा मिळाले. २७ टक्के आरक्षणानुसारच निवडणूका होतील असे सांगत राजकारणातून ओबीसींना वंचित ठेवण्याचे एकप्रकारे विरोधकांचे षडयंत्र होते, अशी टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केली.महाज्योतीच्या सात माळ्यांची प्रशासकीय इमारत आणि बारा माळ्यांच्या प्रशिक्षण केंद्राच्या भूमिपूजन सोहळ्यात ते बोलत होते.



रविवारी पार पडलेल्या या भूमीपूजन समारंभाला महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री तसेच 'महाज्योती'चे अध्यक्ष अतुल सावे, शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर, वित्त राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, खासदार श्यामकुमार बर्वे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.फडणवीस म्हणाले की, समाजातील सर्व घटकांना न्याय देतानाच ओबीसी समाजावर अन्याय होणार नाही याचे भान आमच्या सरकारला आहे. यामुळेच २०१४ मध्ये सरकार आल्यानंतर ३५० जाती समुहाच्या विकासासाठी सर्वप्रथम ओबीसी मंत्रालय सुरू केले. विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरू करतानाच प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना भत्ताही देण्यात येत आहे.फडणवीस म्हणाले की, समाजातील सर्व घटकांना न्याय देतानाच ओबीसी समाजावर अन्याय होणार नाही याचे भान आमच्या सरकारला आहे. यामुळेच २०१४ मध्ये सरकार आल्यानंतर ३५० जाती समुहाच्या विकासासाठी सर्वप्रथम ओबीसी मंत्रालय सुरू केले. विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरू करतानाच प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना भत्ताही देण्यात येत आहे.महाज्योतीच्या माध्यमातून राज्यात ६० पेक्षा अधिक वसतीगृह उभारले आहेत. अनेक गरीब होतकरू विद्यार्थ्यांना याचा फायदा होत आहे. राज्यातील सर्व आर्थिक विकास महामंडळे बळकट करण्यात आली आहेत. ओबीसी समाजातील युवकांना आपल्या पायावर उभे करण्यासाठी १५ लाखांचे बिनव्याजी कर्ज देण्यात येईल. विनातारण तीन लाखापर्यंत कर्ज देण्यात येईल, अशी घोषणा फडणवीस यांनी केली. ओबीसी मंत्री अतुल सावे यांनी प्रास्ताविकातून महाज्योतीचे काम मांडले.

## समृद्धी महामार्गावर दिवाळीच्या गर्दीने गोंधळ; इंधन टंचाई, असुविधांमुळे प्रवासी हैराण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०नागपूर**

समृद्धी महामार्गावर दिवाळीच्या सणामुळे वाहतुकीचा उच्चांक, इंधन टंचाईमुळे शेकडो प्रवासी अडकल्याने गोंधळ उडाला. नागपूर ते मुंबई दरम्यानच्या समृद्धी महामार्गावर शनिवारी उद्घाटनानंतरचा सर्वाधिक प्रवासी व वाहनांचा भार पाहायला मिळाला. मात्र, हा प्रवास सुरळीत न होता शेकडो प्रवाशांसाठी त्रासदायक ठरला, कारण महामार्गावरील अनेक पेट्रोल पंपांवर इंधन संपल्याने अनेकांना तासन् तास प्रतीक्षा करावी लागली.



महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने आता महामार्गावरील सर्व २२ पेट्रोल पंप चालकांना इंधनाचा भरपूर साठा ठेवण्याचे निर्देश दिले आहेत, जेणेकरून अशा प्रकारची परिस्थिती पुन्हा उद्भवू नये.सध्या समृद्धी महामार्गावर दोन्ही बाजूंना प्रत्येकी ११ पेट्रोल पंप आहेत, म्हणजे सुमारे प्रत्येक ७०-७५ किमी अंतरावर एक पंप आहे. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, हे अंतर जास्त असून, अशा लांब पल्ल्याच्या मार्गासाठी दर ३५-४० किमी अंतरावर पेट्रोल पंप असणे आवश्यक आहे.

अनेक पेट्रोल पंपांवर इंधन संपल्यामुळे फक्त काही निवडक पंपांवरच गाड्या भरल्या जात होत्या. त्यामुळे तिथे मोठ्या रांगा लागल्या. या परिस्थितीला पुणे-सांभाजीनगर आणि पुणे-नाशिक-सिन्नर मार्गांची खराब अवस्था अधिकच जबाबदार ठरली, कारण त्यामुळे नागपूर-पुणे प्रवासाला तब्बल १५ तास लागले.

## लाखो विद्यार्थ्यांसाठी दिलासा देणारी बातमी; मेडिकल कॉलेजमध्ये एमबीबीएसच्या जागा वाढल्या

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०मुंबई**

वैद्यकीयशिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महत्त्वपूर्ण माहिती समोर आली आहे. समोर येत असलेल्या आकडेवारीनुसार एमबीबीएसच्या जागा वाढून त्या १ लाख ३७ हजार ६०० झाल्या आहेत. हा आकडा वैद्यकीय प्रवेश परीक्षा असलेल्या नीटची तयारी करत असलेल्या लाखो विद्यार्थ्यांसाठी दिलासा देणारा आहे. यामुळे डॉक्टरीचंशिक्षण घेणं अधिक सुलभ होणार आहे.

मागच्या दहा वर्षांमध्ये भारताने वैद्यकीय महाविद्यालयांची संख्या आणि त्यामध्ये असलेल्या एकूण जागांच्या संख्येमध्ये खूप वाढ झाली आहे. केंद्र सरकारने अनेक योजना आणि धोरणं सुरू केली आहेत. ज्याचं लक्ष्य प्रत्येक जिल्ह्याक एक मेडिकल कॉलेज सुरू करणं हे आहे. मेडिकलमधील जागांची संख्या १ लाख ३७ हजारांवर जाणं मोठी बाब आहे. ही वाढ मर्यादित जागांमुळे मेडिकलच्या प्रवेशापासून वंचित राहणाऱ्या विद्यार्थ्यांना एक संधी प्रदान करणार आहे. या माध्यमातून भारत ग्लोबल हेल्थ सर्व्हिस सेक्टरमध्ये एक शक्ती म्हणून समोर येईल.देशातील एकूण १ लाख ३७ हजार ६०० च्या एमबीबीएसच्या जागांमध्ये सरकारी आणि खाजगी अशा दोन्ही क्षेत्रांचं मोठं योगदान आहे.



सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये एमबीबीएसच्या एकूण जागांची संख्या ही ७३ हजारांपर्यंत पोहोचली आहे. बहुतांश विद्यार्थ्यांचा कल हा सरकारी मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश मिळवण्याकडे असतो. खाजगी कॉलेजपेक्षा कमी शुल्क आणि शिक्षणाचा दर्जा चांगला असल्याने सरकारी मेडिकल कॉलेजला बहुतांश विद्यार्थी प्राधान्य देतात. तर खाजगी महाविद्यालयांमध्ये एमबीबीएससाठी ६४ हजार,३०० जागा उपलब्ध आहेत. तसेच विद्यार्थी कोटा किंवा कर्जाच्या माध्यमातून या महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेतात.दरम्यान, एमबीबीएसच्या जागांमध्ये काही राज्यांमध्ये विशेष करून वाढ झाली आहे. त्यानंतर काही प्रमुख राज्यांमधील एमबीबीएसच्या जागांची संख्या पुढील प्रमाणे झाली आहे. तामिळनाडू ११ हजार ८२५ जागा, कर्नाटक ११ हजार ६९५ जागा, उत्तर प्रदेश ११ हजार २५० जागा, महाराष्ट्रात १० हजार ६९५ जागा एमबीबीएसच्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहेत. याबरोबरच सरकार देशातील इतर भागांमध्येही महाविद्यालयांचा विस्तार करत आहे. त्यामुळे प्रादेशिक असमानता कमी होण्यास मदत होईल.

## विरोधकांच्या 'लवंग्या-सुरसुरी'चा होणार धुरळा,- एकनाथ शिंदेंचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२० ठाणे**

विरोधकांनी आता कितीही लवंग्या-सुरसुरी फोडल्या, तरी आम्ही त्याकडे पाहतही नाही. कारण महायुतीकडे टम बॉम्ब आहे आणि तो फुटला की विरोधकांचं राजकीय अस्तित्व उडून जाईल असा स्फोटक इशारा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यात दिला. महायुतीसोबत महाराष्ट्राची जनता ठामपणे उभी आहे, म्हणूनच आगामी स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पूर्ण बहुमताने आमचीच सत्ता येणार असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

ठाण्यातील रहेजा गार्डन येथे पार पडलेल्या दिवाळी पहाट कार्यक्रमानंतर शिंदे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी एकनाथ शिंदे म्हणाले की, विरोधक दररोज आरोपांचे फटाके फोडतात, पण त्यांच्या त्या फुसक्या लवंग्यांचा आमच्यावर काहीच परिणाम होणार नाही. आम्ही कामगिरीच्या टम बॉम्बने महाराष्ट्र उजळवणार आणि विरोधकांचा धुरळा उडवणार आहोत. आमचं लक्ष विकासावर आहे आणि विरोधकांचं काम फक्त आरोप, टीका करणे आहे असा टोला शिंदेंनी लगावला.

------

## संपादकीय ......

# जोवर अन्नात भेसळ आहे, तोवर आरोग्याची दिवाळखोरी

दिवाळी हा भेसळखोरांचा सुवर्णकाळ असतो. खवा, तूप, साखर, तेल सर्वांत भेसळ. फॉर्मालिन, डिटर्जंट, सिंथेटिक कलर, स्टार्च यांचा मुक्त वापर. 'एफडीए' मात्र या काळात झोपलेले असते!

उत्सव काळात गोडधोड खाणे हा संस्कृतीचा भाग झाला आहे. विशेषतः दिवाळीत गोड अन्नपदार्थांची रेलचेल असते. दिवाळीच्या थोड्याशा कालावधीत मोठ्या प्रमाणात गोडधोड आणि स्निग्ध पदार्थ खाल्ले जातात.

या काळात मोठ्या प्रमाणात मिठाई तयार करण्यासाठी लागणारा खवा, तूप, अन्य कच्चा माल आणि मिठाईची मागणी वाढते. अर्थात, या मागणीच्या प्रमाणात कच्चा माल उपलब्ध नसेल तर गुन्हेगारी तत्त्वे कच्च्या मालात भेसळ करून त्याची विक्री करतात किंवा भेसळयुक्त मिठाई बनवून नफा कमावतात. मग, प्रसार माध्यमांमध्ये एफडीएच्या अधिकाऱ्यांनी इतका भेसळयुक्त खवा जप्त करून नष्ट केला, इतके भेसळयुक्त लोणी पकडले, मिठाईत कर्करोगास निमंत्रित करणारे रंग सापडल्यामुळे व्यापाऱ्यावर कारवाई केली अशा प्रकारच्या बातम्या येतात आणि दिवाळी संपली की सर्वांच्या विस्मृतीत जातात.

आपल्या भागातील अन्न निरीक्षक कोण आहे, हे कुणी जाणतो का? कुणीही नाही. पोलिस स्टेशन माहीत असते, पण अन्नसुरक्षा कार्यालय माहीत नसते. या अन्न निरीक्षकाचे कर्तव्य असते नागरिकांच्या आरोग्याचे रक्षण करणे. पण, प्रत्यक्षात ते काम करतात का?

भेसळयुक्त कच्चा माल, मिठाई किंवा अन्य अन्न पदार्थ विकलेच जाऊ नयेत म्हणून आपल्या देशात ठोस असा 'अन्नसुरक्षा व मानके अधिनियम' २०११पासून लागू आहे. या कायद्याचा मूळ उद्देश हा आहे की शेतीपासून ते ताटापर्यंतच्या सर्व अन्नपदार्थांवर काटेकोरपणे लक्ष ठेवणे. ही वैधानिक रचना इतकी भक्कम आहे की यंत्रणेने जर ठरविले तर निकृष्ट किंवा भेसळयुक्त अन्नपदार्थ विकलेच जाणार नाहीत. पण तसे आहे का? अजिबात नाही! आपण जे अन्न खातो त्याचा आपल्या शरीरावर काय परिणाम होतो, हे विचारणारा कोणीच नाही.

मानवी जीवनात अन्न हे जगण्यासाठी पाण्याइतकेच महत्त्वाचे आहे, पण आता अन्न हे केवळ शेतीउत्पादन न राहता ते एक प्रचंड मोठ्या कारखानदारीचा आणि मार्केट इकॉनॉमीचा अविभाज्य भाग झाले आहे... आणि त्याची किंमत शेतमालापेक्षा कैक पटीने जास्त असते. इकॉनॉमीमध्ये मग चुकीच्या मार्गाने पैसा कमावणारी तत्त्वे निर्माण होतात आणि ती इतकी ताकदवान होतात की त्यांच्या हाती कायदे आणि प्रशासकीय यंत्रणा निष्प्रभ करण्याची आर्थिक शक्ती येते.

अन्न भेसळीने होणारी दुर्दशा थांबवण्यासाठी देशपातळीवर अन्न सुरक्षा प्राधिकरण, राज्यस्तरावर अन्न सुरक्षा आयुक्त, प्रयोगशाळा, अधिकारी, निधी सर्व काही आहे. पण भेसळ थांबली का? नाही. कायदे आहेत, पण नीती नाही. यंत्रणा आहे, पण जबाबदारी नाही आणि त्यांना जाब विचारणारे मंत्री नाहीत! भेसळ रोखण्यासाठी बनवलेले कायदेच भेसळखोरांना संरक्षण देणारी शस्त्रे बनली आहेत. मुंबई, ठाणे, पुणे या शहरांत अन्न व्यावसायिकांची संख्या प्रचंड आहे. त्यांचा व्यवसायदेखील प्रचंड आहे. तेथे पोस्टिंग मिळविण्यासाठी अन्न निरीक्षकांमध्ये स्पर्धा असते. लोकांना चांगले अन्न मिळावे यासाठी ही धडपड असते की अन्य कारणासाठी?

२०१८ मध्ये एका निरीक्षकाने सहा महिन्यांसाठी नऊ लाख रुपयांचा हप्ता मागितला. साडेसात लाखांवर 'तडजोड' झाली असे वृत्त आले होते. पुढे चौकशी झाली किंवा नाही, ते खरे होते की खोटे हे अद्याप गुलदस्त्यात आहे.अन्नभेसळ ही फक्त कायद्याची समस्या नाही, तर ती मानवी अध:पतनाची खूण आहे. कायदे, अधिकारी, निधी, प्रयोगशाळा सर्व काही आहे, पण जोपर्यंत प्रशासन निष्क्रिय आणि जनता उदासीन आहे, तोपर्यंत प्रत्येक दिवाळी गोड नव्हे, घातकच ठरेल. कारण जोपर्यंत अन्नात भेसळ आहे, तोपर्यंत आरोग्यात दिवाळखोरी आहे.






# सावधान! फटाक्यांच्या धुरापासून राहा दूर

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक**

दिवाळी हा प्रकाशाचा आणि आनंदाचा सण असला तरी, अनेक आरोग्य तज्ज्ञांनी या सणादरम्यान होणाऱ्या प्रचंड वायुप्रदूषणाबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली आहे. विशेषतः अस्थमा या श्वसनविकाराने त्रस्त असलेल्या रुग्णांसाठी दिवाळीतील फटाक्यांचा धूर जीवघेणा ठरू शकतो.

मिळालेल्या माहितीनुसार, दिवाळीच्या काळात दिल्ली, मुंबई, कोलकाता यांसारख्या प्रमुख शहरांसह देशभरात वायुप्रदूषण सामान्य दिवसांच्या तुलनेत तब्बल ४ ते ५ पटीने वाढते. या वाढलेल्या प्रदूषणाचा थेट धोका देशातील सुमारे ३.५ कोटी अस्थमा रुग्णांना आहे. जागतिक आरोग्य संघटना (WHO) आणि विज्ञान आणि पर्यावरण केंद्र या दोन्ही संस्थांनी या गंभीर धोक्याबद्दल वारंवार चेतावणी दिली आहे.

**धुरामुळे अस्थमाचा अटॅक का वाढतो?**

फटाक्यांच्या धुरामध्ये अत्यंत लहान आणि विषारी कण (Toxic Particles) असतात, ज्यांना झच् २.५ असे म्हटले जाते. हे कण फुफ्फुसांमध्ये (Lungs) आणि रक्तप्रवाहात सहज प्रवेश करतात.

फुफ्फुसांची जळजळ: अस्थमा रुग्णांमध्ये श्वास नलिका (Airways) आधीच संवेदनशील असतात. झच् २.५ कण या नलिकांमध्ये गेल्याने तीव्र जळजळ (Inflammation) निर्माण होते.

श्वास कोंडणे: यामुळे श्वास नलिका आकुंचन पावतात आणि व्यक्तीला श्वास घेण्यासाठी खूप त्रास होतो. यामुळे अस्थमाचा तीव्र अटॅक येण्याची शक्यता अनेक पटींनी वाढते.

ऑक्सिजनची कमतरता: जर अटॅक तीव्र असेल, तर रुग्णाला तात्काळ वैद्यकीय मदत न मिळाल्यास, शरीरात ऑक्सिजनची (Oxygen) कमतरता होऊन तो जीवघेणा ठरू शकतो.

इतर धोका: केवळ अस्थमाच नाही, तर सीओपीडी (COPD), ब्रॉंकायटिस आणि हृदयविकारांनी त्रस्त असलेल्या लोकांसाठीही हा धूर अत्यंत धोकादायक आहे.

# दिवाळीसाठी किराणा ब्लँकेटसह ड्रेस वाटप

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०दर्यापूर**

मेळघाटमधील आदिवासी बांधवांची दिवाळी साजरी व्हावी, या उद्देशाने दर्यापूरमधील कौसल्यादेवी जगन्नाथ मालपाणी ट्रस्टने टिटंबा येथील गरीब व निराधार कुटुंबांना दिवाळीला लागणारा किराणा वाटप केला.

मालपाणी ट्रस्ट दरवर्षी हा उपक्रम सेवाभाव या उद्देशाने वेगवेगळ्या ठिकाणी राबवते. एकूण २०० कुटुंबांना किराणा किट भेट देऊन त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवले. तसेच येथील लोकांना २०० साड्या, ३०० ब्लँकेट व २०० लहान मुलींना ड्रेसचे वाटप केले. यासह लहान मुलांना बिस्कीट व चिप्सचे वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम शासकीय माध्यमिक आश्रमशाळा टिटंबा येथे पार पडला.या कार्यक्रमप्रसंगी बी. एस. खोचे, रामेश्वर मालपाणी, ॲड. सदानंद जाधव, आनंदसेठ चौरसिया, राजपूत, नंदकिशोर रायबोले, विजय मावस्कर, मधुकर पाचे, अनिल वानखडे, आकाश रेवस्कर, नामदेवराव उटाळे, डॉ. एस. बी. काळे, नंदू सोनी, कन्हैया बुंदेले, गणेश विल्हेकर, रुपराव तिडके, नीलेश वानखडे, गोपाल जऊळकार, बंडू मोरवाल, भागवत, दयाराम धांडेकर आदी उपस्थित होते, असे कळवण्यात आले.

# लक्ष्मीपूजन केल्यानंतर रात्री घराचे दरवाजे उघडे का ठेवतात? जाणून घ्या खरं कारण

दिवाळी म्हणजे प्रकाशाचा आणि आनंदाचा सण. हा सण कार्तिक महिन्याच्या अमावस्येला साजरा केला जातो. दरवर्षी दिवाळीत लक्ष्मी मातेची आणि गणेशाची पूजा केली जाते. धार्मिक श्रद्धेनुसार या दिवशी विधीनुसार पूजा केल्यास लक्ष्मी माता प्रसन्न होतात आणि घरात सुख, समृद्धी व धनाचा आशीर्वाद देतात. पण तुम्ही कधी विचार केला आहे का की दिवाळीच्या रात्री आणि लक्ष्मीपूजनाच्या दिवशी आपले घराचे दरवाजे उघडे का ठेवतात? यामागे एक सुंदर पौराणिक कथा सांगितली जाते.



असं मानलं जातं की दिवाळीच्या रात्री माता लक्ष्मी पृथ्वीवर भ्रमण करतात. त्या अशा घरात प्रवेश करतात जे स्वच्छ, प्रकाशमान आणि श्रद्धेने भरलेले असतात. त्यामुळे माता लक्ष्मीचे स्वागत करण्यासाठी आणि त्यांना घरात प्रवेश देण्यासाठी लोक आपले दरवाजे उघडे ठेवतात. असंही म्हटलं जातं की देवी-देवता अंधाऱ्या आणि अस्वच्छ घरात प्रवेश करत नाहीत, म्हणून दीप लावणे आणि दरवाजे उघडे ठेवणे हे लक्ष्मीस्वागताचे प्रतीक आहे.

असं मानलं जातं की दिवाळीच्या रात्री माता लक्ष्मी पृथ्वीवर भ्रमण करतात. त्या अशा घरात प्रवेश करतात जे स्वच्छ, प्रकाशमान आणि श्रद्धेने भरलेले असतात. त्यामुळे माता लक्ष्मीचे स्वागत करण्यासाठी आणि त्यांना घरात प्रवेश देण्यासाठी लोक आपले दरवाजे उघडे ठेवतात. असंही म्हटलं जातं की देवी-देवता अंधाऱ्या आणि अस्वच्छ घरात प्रवेश करत नाहीत, म्हणून दीप लावणे आणि दरवाजे उघडे ठेवणे हे लक्ष्मीस्वागताचे प्रतीक आहे.

पौराणिक कथेनुसार, एकदा कार्तिक अमावस्येच्या रात्री माता लक्ष्मी पृथ्वीवर फिरायला आल्या. त्या वेळी सगळीकडे अंधार होता आणि त्या मार्ग चुकल्या. त्यांनी ठरवलं की त्या रात्र मृत्युलोकातच घालवायची. त्या प्रत्येक घराच्या दाराशी गेल्या, पण सर्व दरवाजे बंद होते. मात्र एका वृद्ध स्त्रीच्या घराचे दार उघडे होते. तिने दीप लावलेला होता आणि ती कामात गुंतलेली होती. माता लक्ष्मीने तिच्याकडे आश्रय मागितला आणि ती रात्र तिथेच थांबल्या.

सकाळी ती वृद्ध स्त्री जागी झाली तेव्हा तिचं घर सोन्या-रत्नांनी सजलेलं महाल झालं होतं. तिला कळलं की तिच्या घरात आलेली अतिथी म्हणजे स्वतः माता लक्ष्मी होत्या. तेव्हापासूनच ही परंपरा सुरू झाली की दिवाळीच्या रात्री घराचे दरवाजे उघडे ठेवावेत, ज्यामुळे माता लक्ष्मी घरात प्रवेश करून आपल्या भक्तांना संपत्ती, सुख आणि समृद्धीचा आशीर्वाद देतील. आजही लोक घरात दिवे लावून उजेड पसरवतात आणि लक्ष्मी देवीच्या आगमनाची प्रतीक्षा करतात.

# २० की २१ ऑक्टोबर 'लक्ष्मीपूजन' कोणत्या दिवशी करावे?

## जाणून घ्या योग्य तारीख आणि पूजेचा शुभ मुहूर्त



दि.२०विदर्भ प्रजासत्ताक

देशभरात दिवाळीचा सण मोठ्या उत्साह आणि जल्लोषात साजरा केला जातो. दिवाळी हा हिंदू धर्मातील सर्वांत मोठा सण आहे. पाच दिवसांची ही दिवाळी प्रत्येकाच्या घरी सुख, समृद्धी आणते. या पाच दिवसांमध्ये लक्ष्मीपूजनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी लक्ष्मीची पूजा केली जाते. पण, यंदा लक्ष्मीपूजन कोणत्या दिवशी आहे आणि लक्ष्मीपूजन कोणत्या मुहूर्तावर करावे हे या बातमीच्या माध्यमातून आपण जाणून घेऊ

**लक्ष्मीपूजन कधी करावे?**

आश्विन अमावास्येला लक्ष्मीपूजन केले जाते. लक्ष्मीपूजनाचा काळ म्हणजेच प्रदोष काळ (सूर्यास्तानंतरचा काळ) हा जवळपास दोन तासांचा कालावधी असतो. त्या काळामध्ये अमावास्या असणे आवश्यक असते आणि त्या काळात लक्ष्मीपूजन करावे.

**लक्ष्मीपूजन तारीख, तिथी**

२० ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजून ४४ मिनिटांनी अमावास्या तिथी सुरू होणार असून, २१ ऑक्टोबर २०२५ रोजी रात्री संध्याकाळी ५ वाजून ५४ मिनिटांनी अमावास्या तिथी समाप्त होणार आहे.उदय तिथीनुसार, लक्ष्मीपूजन २१ ऑक्टोबरच्या संध्याकाळी केले जाईल.

**लक्ष्मीपूजन शुभ मुहूर्त**

२१ ऑक्टोबर २०२५ रोजी संध्याकाळी ६ वाजून १० मिनिटांपासून ते रात्री ८ वाजून ४० मिनिटांपर्यंत लक्ष्मीपूजनाचा शुभ मुहूर्त असेल.

**दिवाळीत लक्ष्मीपूजन का करतात?**

आश्विन वद्य अमावास्येला लक्ष्मीपूजन करण्याची परंपरा आहे. या दिवशी बलीच्या बंदिवासातून लक्ष्मीची सुटका झाली होती आणि त्याच आनंदात लक्ष्मीपूजन केले जाते, अशी एक आख्यायिका आहे. लक्ष्मीचे वास्तव्य आपल्या घरात नेहमी राहावे यासाठी मनोभावे लक्ष्मीपूजन केले जाते. त्याच कारणामुळे व्यापारी लोकही या दिवशी त्यांच्या कामाच्या ठिकाणी लक्ष्मीपूजन करतात. दिवाळीत लक्ष्मीपूजन का केले जाते याबाबत अनेक आख्यायिका प्रचलित आहेत.

(टीप: वरील लेख प्राप्त माहितीवर आधारित आहे.)

# कौंडण्यपूर येथे कार्तिक यात्रेमध्ये ०८ ते १० नोव्हेंबर दरम्यान रंगारंग कार्यक्रमांची मेजवानी

## अंबा रुक्मिणी महोत्सव २०२५ ची पहिली बैठक संपन्न



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०कौंडण्यपूर**

विदर्भाची पुरातन राजधानी, भगवान श्रीकृष्णाचे सासर, माता रुक्मिणीचे माहेरघर आणि कुलस्वामिनी अंबिका मातेचे शक्तीपीठ असलेल्या श्री क्षेत्र कौंडण्यपूर येथील कार्तिक यात्रेमध्ये दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा या यात्रेमध्ये विविध रंगारंग कार्यक्रमांची मेजवानी घेऊन येणाऱ्या ''महोत्सव विदर्भाचा, विदर्भाच्या पुरातन राजधानीचा'' नामक ''अंबा-रुख्मिणी महोत्सव-२०२५'' ची पहिली बैठक गुरूवार दिनांक १६ ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता श्री अंबिका देवी मंदिर मंगल कार्यालय येथे संपन्न झाली. अंबा रुख्मिणी सांस्कृतिक महोत्सव समितीचे अध्यक्ष श्री रविराजजी देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली सदर बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये तीन दिवस साजरे होणारे विविध उपक्रमांची माहिती महोत्सव समितीचे सचिव अक्षय पुंडेकर यांनी दिली. या बैठकीमध्ये सर्वप्रथम यावर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमाबद्दल चर्चा करण्यात आली. ज्यामध्ये महाराष्ट्रातील सर्वात मोठा बोटिंग शो म्हणजेच नयनरम्य नौका स्पर्धा, एक लाख दिव्यांचा दीपोत्सव, संगीत मैफिल, लोककला व सांस्कृतिक कार्यक्रम, स्वच्छता अभियान, शासकीय योजनाविषयक विविध उपक्रम, विदर्भस्तरीय भव्य एकता मॅरेथॉन स्पर्धा अशा विविध क्षेत्रातील बहारदार कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून विजेता स्पर्धकांना आकर्षक बक्षिसे सुद्धा वितरित करण्यात येणार आहे.

तसेच सदर बैठकीमध्ये उत्सव समितीच्या सभासदांकडून यावर्षी काही नवीन उपक्रम आयोजित करण्याचे सुद्धा ठरविले. त्याचबरोबर यावर्षीच्या कार्यक्रमाची तारीख दिनांक ०८ ते १० नोव्हेंबर ही निश्चित करण्यात आली असून कार्यक्रम पत्रिका लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. सदर बैठकीचे संचालन श्री गजानन बांबल यांनी केले. या बैठकीला सत्कार समितीचे अध्यक्ष व श्री अंबिका देवी संस्थानचे पुजारी श्री नरेंद्र महाराज पुरी, सौ. नायर (सरपंच कुऱ्हा) यांची विशेष उपस्थिती होती. त्याचबरोबर अमोल शेंडे, संतोष मठिये, दिनेशराव ठाकरे, शरद तालन, पांडुरंगजी सराडे, अतुल ठाकरे, विनायकराव कडू, अमोल पुंडेकर, मुकेश पवार, अंकुश देऊळकर (तंटामुक्ती अध्यक्ष, कौंडण्यपूर), प्रशांत कडू, बाळूभाऊ ठाकरे, प्रदीपराव डुबे, गजानन सुखदाम, संतोष अंबाडकर, दिलीपराव मेहकर, गणेश बांबल, आशिष डुबे, संदीप सोटे, मोरेश्वरराव मुळे, रामप्रभु खापरे, विनोद महल्ले, निखिल ठाकरे, संतोष साठवणे, श्रीरामजी केवदे, सुभाष खंडारे, सोनाजी खडसे, गोपी वेरूळकर, दादाराव सर्जे, आकाश ठाकरे, वैभव ठाकरे, आनंद मनोहर, पवन नागमोते, अर्पित डुबे, अक्षय निहाटकर, प्रफुल कडू, शुभम अर्मळ, अभय मेहकर, दक्ष खंडारे, ओम राऊत, रोहित जुमडे, तेजस वानखडे, प्रतीक नेवारे, वैभव हेटे, चेतन नेमाडे, प्रयास भाकरे, राहुल गोहत्रे, सार्थक कदम, संकेत धोटे, हर्षल क्षीरसागर, ओम बोन्डाने, तेजस राजगुरे, यांच्यासह पंचक्रोशीतील नागरिक व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आता आधुनिक यंत्राने करता येईल हळद लागवड; प्रात्यक्षिक यशस्वी ठरलेले डॉ. पंदेकृविचे नवे संशोधन

**दि.२० विदर्भ प्रजासत्ताक**

राज्यात हळद पिकाचे क्षेत्र झपाट्याने वाढत असताना, मजुरांच्या टंचाईमुळे शेतकऱ्यांना लागवड व काढणीस अडचणी येत आहेत. या पार्श्वभूमीवर डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या कृषी महाविद्यालयांतर्गत कृषी अभियांत्रिकी विभागाने हळदीसाठी ट्रॅक्टरचलित आधुनिक लागवड यंत्र विकसित केले आहे.

या यंत्रामुळे हळदीची लागवड जलद, सोपी आणि कमी खर्चात करता येणार आहे. राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाच्या सहाय्याने विकसित करण्यात आलेल्या या यंत्रामुळे ५० ते ७० टक्केपर्यंत लागवड खर्चात बचत होणार असल्याचा दावा संशोधकांनी केला आहे.

कृषी महाविद्यालयाचे सहायक प्राध्यापक डॉ. विवेक खांबलकर यांनी विकसित केलेल्या या यंत्राचे प्रात्यक्षिक गुडधी येथील प्रक्षेत्रावर घेण्यात आले. यावेळी यंत्राद्वारे वायगाव हळदीची लागवड करण्यात आली असून, पीक उत्कृष्ट येत असल्याचे निदर्शनास आले आहे. हे यंत्र ९० सेमी रुंदीचा गादी वाफा तयार करून दोन ओळींमध्ये ४ ते ६ इंच अंतरावर हळद लावते.

प्रात्यक्षिकाच्या वेळी शेकडो शेतकऱ्यांनी यंत्राची प्रत्यक्ष पाहणी केली. सध्या महाराष्ट्रात ८६,००० हेक्टरवर हळद लागवड असून, हिंगोली जिल्ह्यात सर्वाधिक क्षेत्र आहे. अकोला व वाशिम जिल्ह्यांतील शेतकरीही मोठ्या प्रमाणात हळद लागवडीकडे वळत आहेत.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०




**वायगाव हळदीचा प्रयोग**

या हळद लागवड यंत्राच्या सहाय्याने यावर्षी कृषी विद्यापीठाच्या गुडधी येथील प्रक्षेत्रावर प्रात्यक्षिक घेण्यात आले असून, या यंत्राने वायगाव हळद लागवड करण्यात आली आहे. पीक उत्तम आहे.

हे यंत्र लागवड करताना २० सेमीचा गादी वाफा तयार करून देत असून, दोन ओळींच्या अंतरावर चार ते सहा इंच दरम्यान हळद लागवड करता येते.

कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संजय भोयर यांनी प्रक्षेत्राला भेट देऊन हळद पिकाच्या यशस्वी संशोधनाची पाहणी केली आहे. शिवार फेरीत यंत्राला शेकडो हळद लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांनी भेट देऊन बघितले आहे.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!

# विदर्भ प्रजासत्ताक


सोमवार दि. २० ऑक्टोंबर २०२५

शहर/ग्रामिण

# मातींच्या दिव्यांऐवजी चायनीज दिव्यांची विक्री जोऱ्यात

## अमरावतीच्या बाजारात १५० पासून ८०० रुपये प्रती डझन सेलचे दिवे विक्रीला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**



दिवाळीला सुरुवात झाली असून, नागरिकही खरेदीसाठी शहरातील बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात दाखल झाले. या बाजारपेठेत दिवाळीला आवश्यक अशा विविध साहित्यांची दुकाने सजली आहेत. यात दिवाळीला लागणाऱ्या दिव्यांना चांगलीच मागणी असते. मात्र या वेळी मातीच्या दिव्यासह सेलचे, पाण्यावरील, विजेच्या दिव्यांनाही मागणी वाढल्याचे चित्र दिसत आहे.


चीनमधून आयात होणाऱ्या या दिव्यांची रोषणाई नागरिकांना आवडत आहे. त्यामुळे या दिवाळीला तेलाच्या ऐवजी सेलवरील दिव्यांची रोषणाई पाहायला मिळणार आहे. शहरातील बाजारपेठेतून लाखो दिव्यांची विक्री होत असून, १५ ते २० लाखांपर्यंतची उलाढाल होण्याचा अंदाज आहे. चिनी सेलचे दिवे मुंबई, गुजरात येथून मोठ्या प्रमाणात शहरातील बाजारपेठेत विक्रीस उपलब्ध झाले आहेत. सध्या नागरिकांना या दिव्यांचे आकर्षण असून, खरेदी वाढल्याचे चित्र दिसत आहे.

या वेळी बाजारात पाण्यावरील दिवे, सेलचे बटन असलेले दिवे, टी लाइट, वॅक्स दिवे, शाडो दिवे, स्मोकलेस दिवे आदी उपलब्ध आहेत. या दिव्यांसह फॅन्सी कॅंडल ही उपलब्ध आहेत. हे दिवे व कॅंडल अनेक रंगात उपलब्ध असून रंगीत दिव्यांचे जास्त आकर्षण आहे. सध्या या दिव्यांची बाजारपेठेत प्रति डझन किंमत १५० रुपयांपासून ८०० रुपयांपर्यंत आहे. हा सेलवरील दिवा ४ दिवस चालतो. या दिव्यांना तेल, वातीची गरज नाही. तसेच हा दिवा हवेतही सुरूच राहतो. त्यामुळे सध्या नागरिकही या दिव्यांची मागणी करत असून, या दिवाळीला अंगणात तेलाच्या ऐवजी चिनी सेलच्या दिव्यांची रोषणाई होणार आहे. या दिव्यांची विक्री मोठ्या प्रमाणात होत आहे. सेलवरील दिव्यांची बाजारपेठेत प्रतिडझन किंमत १५० रुपयांपासून ८०० रुपयांपर्यंत आहे.

# नगरपालिका मतदार यादीवर १३ हजार आक्षेप

## मोर्शीत सर्वाधिक ३१३४, चिखलदऱ्यात सर्वात कमी ८० हरकती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०मोर्शी**



अमरावती जिल्ह्यात आगामी नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी जाहीर झालेल्या प्रारूप मतदार यादीवर १३ हजारांहून अधिक आक्षेप दाखल झाले आहेत. या मोठ्या संख्येमुळे जिल्हा प्रशासनाची डोकेदुखी वाढली असून, अंतिम मतदार यादी तयार करणे आव्हानात्मक बनले आहे. मोर्शी नगरपालिकेत सर्वाधिक ३,१३४ हरकती नोंदवण्यात आल्या आहेत, तर चिखलदरा नगरपालिकेत सर्वात कमी ८० हरकती प्राप्त झाल्या आहेत.

जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांच्या निर्देशानुसार, १० नगरपालिका आणि दोन नगरपंचायतींच्या प्रारूप मतदार याद्या ८ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या. या याद्यांवर १४ ऑक्टोबरपर्यंत हरकती व सूचना मागवण्यात आल्या. मात्र, हरकतींची संख्या वाढत असल्याने निवडणूक आयोगाने मुदतवाढ दिली, जी शुक्रवारी संपली. या कालावधीत जिल्ह्यात एकूण १३ हजारांहून अधिक तक्रारी दाखल झाल्या.

प्राप्त हरकतींमध्ये मोर्शी नगरपालिकेच्या यादीबाबत सर्वाधिक ३,१३४ तक्रारी तहसीलदारांमार्फत जिल्हा प्रशासनाकडे आल्या आहेत. त्याखालोखाल वरुड नगरपालिकेशी संबंधित २,०३० तक्रारी आहेत. नांदगाव खंडेश्वर नगरपंचायतीच्या मतदार यादीवर १,७०७ जणांनी आक्षेप नोंदवला आहे, तर चांदूर बाजार नगरपालिकेबाबत १,२५० तक्रारी दाखल झाल्या आहेत.

इतर नगरपालिकांमध्ये अंजनगाव सुर्जीसाठी १,१८७, चांदूर रेल्वेसाठी १,०५९, धारणी नगरपंचायतीसाठी ८८२, अचलपूरसाठी ७६१, दर्यापूरसाठी ४११, शेंदुरजनाघाटसाठी ३९६ आणि चिखलदरा नगरपरिषदेच्या मतदार यादीवर ८० नागरिकांनी हरकती नोंदविल्या आहेत.या सर्व हरकतींची पडताळणी करून जिल्हाधिकारी यांच्या नेतृत्वात सुनावणीअंती सुधारित मतदार यादी तयार केली जाईल. ही यादी विभागीय आयुक्तांकडे पाठवली जाईल आणि त्यांच्या शिक्कामोर्तबानंतर ३१ ऑक्टोबर रोजी अंतिम मतदार यादी प्रकाशित केली जाणार आहे.

मतदार यादीवर मोठ्या प्रमाणात आक्षेप येण्याचे मुख्य कारण म्हणजे, प्रशासनाने १ जुलै २०२५ रोजी उपलब्ध असलेल्या विधानसभा निवडणुकीच्या मतदार यादीला आधार मानून नगरपालिका-नगरपंचायतींच्या याद्या तयार केल्या आहेत. या विभाजन प्रक्रियेत काही नावे एका प्रभागातून दुसऱ्या प्रभागात गेली आहेत, तर काही भाग वगळले गेल्याने नागरिकांनी मोठ्या प्रमाणात तक्रारी नोंदविल्या आहेत.

# शेतकऱ्यांनो आत्महत्या करण्याऐवजी आमदारांना कापून टाका

## बच्चू कडू यांचे खळबळजनक विधान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०बुलढाणा**

प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख आमदार बच्चू कडू यांनी अत्यंत वादग्रस्त आणि धक्कादायक विधान करून मोठी खळबळ उडवून दिली आहे. शेतकरी आत्महत्येच्या विषयावर बोलताना त्यांनी थेट आमदारांना 'कापून टाकण्याची' भाषा केली आहे. तसेच हा कार्यक्रम सुरू केला, तर सरकार गुडघ्यावर येईल. पण मरण्यापेक्षा लढणे सुरू करा, असेही बच्चू कडू म्हणाले. बुलढाण्यातील शेतकरी हक्क परिषदेत ते बोलत होते.



बुलढाणा जिल्ह्यातील पातुर्डा गावात नुकतीच राज्यव्यापी शेतकरी हक्क परिषदत पार पडली. या परिषदेत राष्ट्रीय समाज पक्षाचे प्रमुख महादेव जानकर, बच्चू कडू आणि ऑल इंडिया पॅन्थर सेनेचे दीपक केदार यांच्या प्रमुख सहभागाने चर्चा झाली. दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर आयोजित ही परिषद शेतकऱ्यांच्या दुःखाची आणि वेदनेची सभा ठरली. यावेळी बोलताना बच्चू कडू यांनी स्वत: आत्महत्या करण्यापेक्षा आमदारांना कापून टाका, असे खळबळजनक विधान केले.

**नेमके काय म्हणाले बच्चू कडू?**

ही वेदनाची परिषद, दुःखाची परिषद आहे. दिवाळीच्या दिवशी ही घ्यावी लागत आहे. तुम्ही विचाराची लढाई सोडली आणि जातीपातीची लढाई सुरू केली, त्यामुळे शेतकरी मागे राहिला. शेतकऱ्यांना कमी भावात सोयाबीन विकावे लागत असेल तर शेतकऱ्यांनी बांगड्या भराव्यात. मोर्चे, मेळावे, प्रचाराला गर्दी असते, मात्र शेतकरी परिषदेला गर्दी कमी असते., असे बच्चू कडू म्हणाले.

# निराधारांना आधार देत प्रविण पोटे पाटील यांची दिवाळी साजरी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

दिवाळीचा सण हा आनंदाचा, प्रकाशाचा आणि आपुलकीचा असतो. या सणाचे खरे स्वरूप समाजातील दुर्लक्षित आणि निराधार घटकांपर्यंत पोहोचवण्यासाठी माजी राज्यमंत्री मा. श्री. प्रविण पोटे पाटील, श्रेयसदादा पोटे पाटील व श्रुतीताई पोटे पाटील यांनी दरवर्षीप्रमाणे यंदाही आगळ्या-वेगळ्या पद्धतीने दिवाळी साजरी केली.

अमरावती महानगरपालिकेच्या आधार केंद्रात वास्तव्य करणाऱ्या निराधार नागरिकांसोबत दिवाळी साजरी करत पोटे पाटील कुटुंबीयांनी सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण समोर ठेवले.कार्यक्रमाची सुरुवात अभ्यंगस्नान करून करण्यात आली. त्यानंतर उपस्थित निराधारांना नवीन कपडे, फराळ, मिष्टान्न तसेच आवश्यक जीवनोपयोगी साहित्य वाटप करण्यात आले. हा उपक्रम केवळ सामाजिक मदतीपुरता मर्यादित नसून, त्यांच्या आयुष्यात थोडासा का होईना, आनंद आणि उजाळा निर्माण करणारा होता. तसेच दिवाळीच्या दिवशी पुरणपोळीचे जेवणाचे आयोजन सुद्धा करण्यात आले आहे.

या वेळी बोलताना मा. प्रविण पोटे पाटील म्हणाले, निराधार व वयोवृद्ध नागरिकांना आधार देणं हे आपल्या सामाजिक जबाबदारीचं एक रूप आहे. एक पणती लावून आपण त्यांच्या आयुष्यात प्रकाश टाकू शकतो. अनेक वर्षांपासून अशा प्रकारे दिवाळी साजरी करत असताना जे आत्मिक समाधान मिळतं, ते शब्दात मांडणं कठीण आहे.

श्रेयसदादा पोटे पाटील यांनी देखील उपस्थितांना उद्देशून भाषण करताना सांगितले की, सामाजिक बांधिलकी ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. युवा पिढीने अशा उपक्रमांत सक्रिय सहभाग घ्यावा, हाच खरा परिवर्तनाचा मार्ग आहे.

यापूर्वीही प्रविण पोटे पाटील यांनी या आधार केंद्रासाठी टीव्ही संच, वॉटर कूलर, डेझर्ट कुलर आणि विविध जीवनावश्यक वस्तू भेट दिल्या असून, गरजूंना मदतीचा हात देण्यात ते नेहमी अग्रेसर असतात.

कार्यक्रमावेळी शिवराय कुळकर्णी, जयंत डेहनकर, तुषार भारतीय, चेतन पवार, ॲड. प्रशांत देशपांडे, चेतन गावंडे, सुरेखाताई लुंगारे, लताताई देशमुख, रश्मी नावंदर, स्वाती निस्ताने , भारती गुहे, सतीश करेसीया, प्रकाश पुंड, डॉ बबन लायदे, मनीष चौबे, अभिजित वानखडे, अंकित कावळे संजय कटारिया आदी मान्यवर उपस्थित होते.

# फराळाचा सुगंध देशाबाहेरही; डाक विभागाची दिवाळी विशेष सेवा लोकप्रिय




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

दिवाळी म्हणजे फराळ रेलचेल असते. चिवडा, लाडू, शंकरपाळे, शेव, चकली, अनारसे, करंजी आदीचा फडशा पाडल्याशिवाय दिवाळी काही केल्या पूर्ण होत नाही. अशात डाक विभागाच्या माध्यमातून विदेशात फराळ पाठविण्याचे प्रमाण दरवर्षी वाढत आहे. यंदाही डाक विभागाद्वारे रशिया, कॅनडा, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया अन् फ्रान्सला अमरावतीकरांनी विदेशातील आप्तांसाठी दिवाळी फराळाचा गोडवा स्पीडपोस्टद्वारे पोहोचला आहे.

डाक विभागाने यंदा विशेष उपक्रम हाती घेत विदेशात राहणाऱ्या नातेवाइकांना दिवाळी फराळ पाठविण्यासाठी सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या उपक्रमामुळे विदेशात स्थायिक झालेले तसेच शिक्षण व नोकरीच्या निमित्ताने असलेल्या अमरावतीकरांना फराळ पाठविण्याची सोय झाली आहे. त्याचा लाभ मागील काही दिवसांपासून अनेकांनी घेतला आहे. या माध्यमातून डाक विभागाला मोठा महसूल प्राप्त झाला आहे. डाक विभागाकडून प्राप्त माहितीनुसार आतापर्यंत अमरावती येथील डाकघरातून रशिया, कॅनडा, इंग्लंड ऑस्ट्रेलिया, फ्रान्स व अन्य ठिकाणी राहत असलेल्या विदेशातील कुटुंबियांपर्यंत पोहोचला दिवाळीच्या फराळचा गोडवा डाक विभागामार्फत पोहोचविला आहे.


**कोरड्या स्वरूपातील फराळ पाठविण्याची सुविधा**

डाक विभागामार्फत विदेशात पाठविला जाणारा दिवाळी फराळ हा कोरड्या स्वरूपात पाठविता येतो. स्पीड पोस्टद्वारे ३० किलोपर्यंत तर पार्सल सेवेने २० किलोपर्यंत फराळ पाठविण्यात येत आहे. फराळ कुठल्या देशात पाठविण्यात येत आहे. त्यानुसार वेगवेगळे दर आकारण्यात येत आहेत. यासाठी टपाल कार्यालयात सुरक्षित बॉक्समध्ये पॅकिंगची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

**आतापर्यंत २.५० क्विंटल फराळ रवाना**

डाक विभागाद्वारे दिवाळीनिमित्त सुरू केलेल्या या सुविधेद्वारे अनेकांनी विदेशात राहणाऱ्या आपल्या आप्तांसाठी ही सुविधा सुरू झाल्यापासून तर आतापर्यंत जवळपास २.५० क्विंटल दिवाळी फराळ विदेशात पाठविला आहे.

# नवसारीतील घाणीचा स्फोट! नागरिकांचा मनपाविरोधात ठिय्या आंदोलनाने प्रशासनाला जागं केलं



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

नवसारी परिसरातील नागरिकांचा संताप आज उफाळून आला, जेव्हा त्यांनी परिसरातील ग्राउंडजवळ मनपा प्रशासनाविरोधात ठिय्या आंदोलन करत रस्ता रोको केला. मनपा कर्मचाऱ्यांनी परिसरातील कचरा ग्राउंडवर साठवून तो थेट मुख्य रस्त्यावर फेकल्याने नागरिकांचा रोष वाढला.गेल्या अनेक दिवसांपासून या परिसरात साचलेल्या कचऱ्यामुळे दुर्गंधीचे आणि घाणीचे वातावरण निर्माण झाले होते. सकाळी फिरायला जाणारे नागरिक व वाहनधारक यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते. कचऱ्याच्या ढिगाऱ्यामुळे अपघाताचे प्रसंग देखील उद्भवत होते. प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही कोणतीही कारवाई न झाल्याने अखेर संतप्त नागरिकांनी आक्रमक पवित्रा घेत आंदोलन छेडले. जवळपास तीन ते चार तास चाललेल्या या आंदोलनामुळे वाहतूक ठप्प झाली. शेवटी मनपा अधिकारी घटनास्थळी दाखल झाले आणि तातडीने कचरा उचलल्यावरच नागरिकांनी आंदोलन मागे घेतले.स्थानिकांनी प्रशासनाकडून कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

# वन्य प्राण्यांपासून पिकांचे नुकसानीचा मिळालेला मोबदला केला परत

## नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील माहुली चोर येथील शेतकरी संतप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०नांदगाव खंडेश्वर**

तालुक्यातील माहुली चोर येथील शेतकऱ्याला वन्य प्राण्यांपासून झालेल्या पिकाच्या नुकसानी बाबत वनविभागाकडून कडून केवळ १ हजार २२३ रुपयांचा मोबदला देऊन शेतकऱ्याची एक प्रकारे चेष्टा केली. त्यामुळे अक्षय पवार या शेतकऱ्याने मिळालेला मोबदला घनादेशद्वारे वन विभागाकडे परत केला.

माहुली चोर तसेच परिसरात वन विभागाचे मालकीची बाभूळबन आहे. त्यामुळे या परिसरात रोही, हरिन, डुक्कर या प्राण्यांचा मोठ्या प्रमाणात त्रास शेतकऱ्यांना आहे. हे प्राणी शेतकऱ्याच्या शेतातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान करतात. तक्रार ऑनलाईन केल्यानंतर अर्जाची प्रत सुद्धा द्यावी लागते. त्यानंतर वन विभागाचे कर्मचारी, कृषी सहायक यांनी ठरवलेल्या तारखेला शेतात पंचनाम्याकरिता इतर कामे बाजूला ठेवून शेतकऱ्याला शेतात हजर राहावे लागते. पंचनामा करतेवेळी वन विभागाचे कर्मचारी हे केवळ पंचनाचे दिवसी झालेलेच नुकसान पंचनाम्यात दर्शवितात. पंचनाम्याचे आधी खाल्लेल्या पिकाला पंचनामाचे वेळी पालवी आलेली असते. तसेच पंचनामा नंतरही पिकाची नुकसान वन्य प्राणी करतात. येईल. बहुतेक वेळी तुर पिकांचे १०० टक्के नुकसान असते. परंतु, पंचनामा करणारे वनविभागाचे कर्मचा कर्मचारी, तलाठी, कृषी सहायक हे केवळ ज्या दिवशी पिकाचा पंचनामा असतो. त्याच वेळेस त्यांना दिसणार नुकसान पंचनाम्यात दर्शवतात. त्यामुळे शेतकऱ्यांच खूप मोठ नुकसान असताना त्यांना मिळणारी मोबदला अतिशय अल्प असतो. त्यामुळे येथील शेतकरी अक्षय पवार यांनी त्यांना सोयाबीन पिकाचे नुकसानी बाबत मिळालेला १ हजार २२३ रुपयांचा मोबदला धनादेशाव्दारे वनविभागानाला परत केला. निखिल चोरे, अंकुश कोल्हे, श्याम तीखीले संदीप सरोदे, अतुल जाधव, विशाल राऊत, मनीष देठे, भूषण साव यांची उपस्थिती होती.

# सोयाबीनचे शासकीय खरेदी केंद्र सुरू न झाल्याने खासगीत विकण्याची वेळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

यंदा अतिवृष्टीमुळे खरिपातील मुख्य घट आली आहे. जिल्ह्यात सोयाबीनचे प्रतिरका सरासरी रात ते दोन क्विंटल सोयाबीन पिकले आहे. यातच खासगी बाजारात सोयाबीनला अत्यल्प भाव मिळतो आहे, असे असतानाही शासनाने सोयाबीनचे शासकीय खरेदी केंद्र सुरू केले नाही. दिवाळीपूर्वी ते सुरू होणे शेतकऱ्यांना अपेक्षित होते. पीक सोयाबीनच्या उत्पादनात प्रचंड आता दिवाळीचा दिवस उजाडला तरीही शेतकऱ्यांना खासगी बाजारातच प्रतिक्विंटल तीन ते चार हजार रुपये दराने सोयाबीन विकावे लागत आहे. यावरून शासनाचे शेतकऱ्यांवर असलेले 'प्रेम' दिसत आहे. या प्रकारामुळे शेतकरी प्रचंड संताप व्यक्त करत आहे.जिल्ह्यातील खरीप हंगामाचा विचार करता सोयाबीन आणि कापूस या दोन पिकांकडे नगदी पिके म्हणून पाहिले जाते. यंदा मात्र सोयाबीनची निसर्गाच्या अवकृपेने पुरती वाट लागली. शेतकऱ्याने सोयाबीनसाठी पेरणीपासून ते काढणीपर्यंत केलेला खर्चसुद्धा वसूल झाला नाही, अशी ९० टक्के शेतकऱ्यांची स्थिती आहे. अशाव अशावेळी शासकीय हमीभाव मिळाल्यास 'फुल ना फुलाची पाकळी या उक्तीप्रमाणे शेतकऱ्याला काहीतरी मदत झाली असती. मात्र शासनाने दिवाळी आली तरीही शासकीय खरेदी सुरू केलेले नाहीत. वास्तविकता मागील वर्षी १ ऑक्टोबरपासून सोयाबीनची शासकीय खरेदी सुरू झाली होती. अतिवृष्टीमुळे



शेतकऱ्याचे नुकसान झाले म्हणून शासनाकडून शेतकऱ्याला तुटपुंजी मदत करण्यात आली आहे. ती सुद्धा अद्याप शंभर शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेली नाही. त्या मदतीसोबतच शासकीय खरेदी केंद्र सुरू झाले असते तर शेतकऱ्याने घाम गाळून पिकवलेल्या मालाला सन्मानजनक भाव मिळाला असता. मात्र शासकीय खरेदी केंद्र सुरू नसल्यामुळे शेतकऱ्यांना नाइलाजास्तव खासगी बाजारात जो मातीमोल भाव मिळेल, त्या भावाने सोयाबीन विक्री करावी लागत आहे. शेतकऱ्याच्या या गंभीर मुद्द्यांवर मोजके एक, दोन लोकप्रतिनिधी वगळता कोणीही आवाज उचलला नाही. त्यामुळे आता केवळ निवडणूक काळातच शेतकरी हा राजकीय व्यक्तींचा केंद्रबिंदू असतो का? अशी चर्चा जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये सध्या चर्चेत आला आहे.

**कापूस खरेदी केंद्रही सुरू झाले नाही; शेतकरी चिंतेत सोयाबीनचे शासकीय खरेदी केंद्र**

अद्याप सुरू झाले नाही, वास्तविकता दरवर्षी दिवाळीपूर्वीच सोयाबीन आणि कापूस खरेदीसाठी शासकीय केंद्र सुरू होत असतात. मात्र शासनाने शेतकऱ्याच्या या मुद्द्याकडे सपशेल दुर्लक्ष केलेले आहे.

# एकमेकांचे चेहरे न पाहणारे आज दीपोत्सव एकत्र साजरा करत आहे

## नवनीत राणांची ठाकरे बंधुवर जळजळीत टीका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२२०अमरावती**

लोकसभेत ते जिंकले तर लोकशाही जिवंत आहे. विधानसभेत ते हारले तर लोकशाहीची हत्या, संविधानाची हत्या असं म्हणाचंय. लोकसभेत निवडून आले तेव्हा जिवंत असणारी लोकशाही चार महिन्यातच कशी मरू शकते? असं विधानं करून विरोधक जोक करत असल्याची टीका भाजपा नेत्या नवणीत राणा यांनी महाविकास आघाडीवर केली आहे.



लोकसभा निवडणुकीत विरोधी पक्षानं मतचोरी केल्यानंच आपल्याला पराभव पत्करावा लागला असा आरोप, भाजपा नेत्या तथा माजी खासदार नवनीत राणा यांनी विरोधी पक्षावर केला.

राज्यातील शेतकरी आणि लाडक्या बहिणींना मदत कशी करता येईल? पायाभूत सुविधा कशा वाढवता येईल? यावर खरं तर विरोधकांनी लक्ष देणं गरजेचं होतं. पण या उलट ते मतचोरी कशी आणि कुठे झाली? यासारख्या विविध विषयावर बोलतात. काँग्रेसनं गेल्या सत्तर वर्षात यापेक्षा वेगळे काही केलं नसल्याचा आरोपही त्यांनी केला.

जोपर्यंत निवडणूक याद्यांमधील घोळ निस्तरले जात नाहीत, तोपर्यंत निवडणुका होऊ देणार नाही, असा इशारा मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी दिला आहे. याबाबत त्या म्हणाल्या, विरोधकांनी यापूर्वीही निवडणूक आयोगाकडे अनेक मागण्या आणि इशारे दिले आहेत. पण, प्रत्यक्षात जनतेसाठी काहीही ठोस काम केलं नाही.

लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह महाविकास आघाडीकडून सातत्यानं मत चोरी होत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. यावर नवनीत राणा यांनी महाविकास आघाडीवर पलटवार केला. लोकसभा निवडणुकीतील पराभवाबाबतही नवनीत राणा यांनी स्पष्टपणे सांगितलं की, निवडणुकीत मोठ्या प्रमाणावर मतांची चोरी झाली. त्याचा फटका मलादेखील बसला. त्यामुळेच माझा पराभव झाला.

पतीला मंत्री पद न मिळाल्याचं दुःख - पती, आमदार रवी राणा यांना मंत्री पद मिळणार अशी आशा होती. पण ते मिळालं नाही. पण ते दुःख मात्र असं आहे की कोणाला सांगू शकत नाही. मंत्री पदासाठी वर्णी लागेल म्हणून त्यांनी बहुधा जॅकेट शिवली असावीत. त्यापैकी एक त्यांनी आज घातले असेल, असं मिश्किलपणे त्यांनी म्हटलं.

चेहरेसुद्धा पाहत नव्हते - स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडण्यापूर्वी मनसे आणि शिवसेना (यूबीटी) एकत्र येणार असल्याची चर्चा आहे. त्यावरून माजी खासदार नवनीत राणा यांनी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली. त्या म्हणाल्या, मजबुरीचं नाव ठाकरे परिवार' आहे. आज उद्धव आणि राज ठाकरे मजबुरीत एकत्र आले आहेत. जर बाळासाहेब ठाकरे यांच्या निधनाच्या वेळी हे दोघे एकत्र आले असते, तर म्हणता आलं असतं की ही विचारांची एकजूट आहे. पण, आता जेव्हा सत्ता हातातून गेली, तेव्हा जे एकमेकांचे चेहरेसुद्धा पाहत नव्हते. ते आज दीपोत्सव एकत्र साजरा करत आहेत, टोला माजी खासदार राणा यांनी लगावला.

# शिवसेना इच्छुक उमेदवारांचे अर्ज निःशुल्क स्वीकारणार

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अमरावती**

महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने प्रत्येक पक्षाने इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविले आहे. उबाठा शिवसेनेकडून सुद्धा शुल्कासह अर्ज सादर करण्याचे आवाहन जिल्हाप्रमुखांकडून करण्यात आले होते. मात्र शुल्क जमा करण्याच्या कारणावरून शिवसेनेमध्ये मतेमतांतरे दिसून आली.

एकीकडे स्थानिक पातळीवरून शुल्कासह अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले तर दुसरीकडे मात्र वरिष्ठ स्तरावरून निःशुल्क अर्ज जमा करा असे आदेश देण्यात आले. शिवसेना जिल्हाप्रमुखांकडून महापालिका निवडणुकीकरिता शुल्कासह उमेदवारी अर्ज जमा करण्याचे आवाहन करण्यात आले. त्यानुसार अर्ज वाटप करण्यात आले मात्र माहितीनुसार वरिष्ठ स्तरावरून इच्छुक उमेदवारांकडून शुल्क घेऊ नका, निःशुल्क अर्ज भरून घ्या असे आदेश देण्यात आलेत. त्यामुळे जिल्हा प्रमुखांच्या आदेशावर प्रश्नचिन्ह निर्माण करण्यात आले. वरिष्ठांच्या आदेशानंतर मात्र जिल्हाप्रमुखांनीसुद्धा इच्छुक उमेदवारांना अर्ज सादर करताना शुल्क अदा करू नये असे मेसेज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरित केले. प्राप्त माहितीनुसार स्थानिक जिल्हाप्रमुखांनीसुद्धा त्यांच्या उपनेत्यांना विचारून कुणीही इच्छुक म्हणून अर्ज सादर करेल याकरिता नाममात्र शुल्क ठेवले होते. अन्य पक्षाच्या वतीने सुद्धा शुल्क घेण्यात आले. मात्र वरिष्ठांच्या आदेशानंतर मात्र पुन्हा निःशुल्क अर्ज सादर करण्याचे आदेश देण्यात आल्याने आता शिवसेनेमध्ये इच्छुक उमेदवारांची भरमार असल्याचे दिसून येईल अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे.

# रहाटगाव बनावट नोट प्रकरणात आणखी दोन जणांना अटक

## ५७ हजार रुपयांच्या बनावट नोटा जप्त; आतापर्यंत पाच आरोपी पोलिसांच्या ताब्यातमुख्य सूत्रधाराचा शोध सुरू; नांदगावपेठ पोलिसांची सलग कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०नांदगाव पेठ**



रहाटगाव परिसरात उघडकीस आलेल्या बनावट चलनी नोटांच्या प्रकरणात नांदगाव पेठ पोलिसांनी रविवारी आणखी दोन संशयितांना अटक करून ५७ हजार रुपयांच्या बनावट नोटा जप्त केल्या आहेत. आतापर्यंत या प्रकरणात पाच जणांना अटक करण्यात आली असून, या रॅकेटचा मास्टरमाईंड अद्याप फरार आहे. पोलिसांकडून त्याचा शोध घेण्यासाठी वेगाने तपास सुरू आहे.अटक करण्यात आलेले आरोपी आदित्य रामेकर (रा. समर्थवाडी, रहाटगाव) व यश सतीश बर्वे (रा. दत्तवाडी, रहाटगाव) हे असून, आदित्य रामेकर याच्याकडून तब्बल ४८ हजार रुपयांच्या, तर यश बर्वे याच्याकडून ९ हजार रुपयांच्या बनावट नोटा हस्तगत करण्यात आल्या आहेत. पोलिसांनी दोघांना ताब्यात घेऊन पुढील तपास सुरू केला आहे. या आधी पोलिसांनी तीन आरोपींना अटक करून काही प्रमाणात बनावट चलनी नोटा जप्त केल्या होत्या. या सलग कारवायांमुळे रहाटगाव परिसरातील बनावट नोटांच्या अवैध व्यवहारांवर पोलिसांनी मोठा आळा घातला आहे. प्राथमिक तपासात असे दिसून आले आहे की, या आरोपींनी बनावट नोटा स्थानिक बाजारात आणि किरकोळ व्यवहारांमध्ये वापरून चलनात आणण्याचा प्रयत्न केला होता.बनावट नोटा बनविणाऱ्यांचे धाबे दणाणले असून मोठे रॅकेट समोर येण्याची दाट शक्यता वर्तविला जात आहे. सदर कारवाई मा. पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, मा. पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, तसेच मा. सपोआ कैलास पुंडकर (फ्रेजरपुरा विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली वपोनि दिनेश दहातोंडे यांच्या नेतृत्वात पार पडली. या पथकात पोहेकॉ राजाभाऊ राऊत, पोकॉ राजीक खान, पोकॉ निलेश साविकार, पोकॉ राजा सय्यद, पोकॉ वैभव तिखीले आणि पोकॉ अमित ढोले यांनी विशेष परिश्रम घेतले.या सलग आणि प्रभावी कारवायांमुळे शहरात चलनात असलेल्या बनावट नोटांच्या प्रसारावर आळा बसला असून,याप्रकरणी प्रत्येक हालचालीवर तसेच संशयितांवर देखील पोलीस नजर ठेवून आहेत.

> या प्रकरणातील मुख्य सूत्रधाराचा शोध सुरू असून बनावट नोटा नेमक्या कोठे आणि कशा पद्धतीने तयार केल्या जातात, याचा सखोल तपास सुरू आहे. प्राथमिक चौकशीतून असे संकेत मिळाले आहेत की या मागे एक संगठित टोळी कार्यरत आहे. लवकरच या रॅकेटचा मास्टरमाईंड हाती लागेल.पोलीस या प्रकरणी गंभीरतेने कारवाई करत असून हे संपूर्ण रॅकेट लवकरच जेरबंद असेल.
>
> **दिनेश दहातोंडे**
> **वरिष्ठ पोलीस निरीक्षकपोलीस स्टेशन नांदगाव पेठ**

# अभिमानस्पद;जिल्हा परिषदेचे ३२ विद्यार्थी विभागीय क्रीडा स्पर्धेसाठी पात्र; मुलींचे सहभाग लक्षणीय

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०नांदगाव पेठ**



क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अमरावती यांच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, नांदगाव पेठ येथील विद्यार्थ्यांनी दमदार कामगिरी करत विविध खेळप्रकारात ३२ पेक्षा अधिक विद्यार्थी विभागीय क्रीडा स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत. यवतमाळ आणि वाशीम येथे होणाऱ्या या विभागीय स्पर्धांमध्ये हे विद्यार्थी अमरावती जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत. १४ ते १९ वयोगटातील मुला-मुलींसाठी आयोजित जिल्हास्तरीय स्पर्धांमध्ये धावण्याच्या (१००, २००, ४००, १५०० मीटर व ६ किमी), लाँग जंप, हर्डल्स, गोळाफेक, रिले रेस, कबड्डी (मुली), बुद्धिबळ, कॅरम आणि कुस्ती अशा विविध खेळांमध्ये नांदगाव पेठ शाळेच्या खेळाडूंनी शानदार कामगिरी करून विजेतेपद पटकावले. विशेष म्हणजे या सर्व स्पर्धांमध्ये मुलींनी लक्षणीय वर्चस्व गाजवले असून त्यांच्या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.शाळेच्या या भव्य यशाबद्दल बोलताना प्राचार्य देवेंद्र ठाकरे म्हणाले की, विद्यार्थ्यांचे हे यश मेहनत, शिस्त आणि शिक्षक-पालकांच्या अखंड पाठबळाचे फलित आहे. विभागीय स्तरावरही आमचे विद्यार्थी चमकदार कामगिरी करून राज्यस्तरावर झेप घेतील, असा विश्वास आहे. या विजयानंतर संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण असून उपप्राचार्य सुनील राऊत, क्रीडा मार्गदर्शक गजानन राणे यांच्यासह शिक्षक अशोक चाफले, ए. एस. बनसोडे, के. जे. शेख,रामकृष्ण उपरीकर, संजय डांगे, व्ही. एम. गुरव, प्रणाली ढोणे, जे. टी. आझडे, कल्पना वर्हेकर, माया बागडे, देवपल ब्राम्हण, यु. एस. घारड, डॉ. जयश्री इंगळे, ज्योती नारखेडे, आसीया शेख, चंदा इंगळे, स्वाती बोडाखे, प्रशांत वाडीकर, हेमंतकुमार यावले, जीवनमाला बोरकर, शितल अटाळकर, नितीन फाळके, नीरज दारोकर, उद्धव पांढरीकर, तेजस्विनी शेंडे, धनंजय देशमुख, प्रतिभा भुले, उमेश केने यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# कुऱ्हा येथे शेतकरी न्याय हक्क विचार मंच कडून शेतकरी सभा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२० कुऱ्हा**



कुऱ्हा तालुका तिवसा येथे शेतकरी न्याय हक्क विचार मंचाच्या वतीने संस्थापक अध्यक्ष दिनेश वानखडे यांचे मार्गदर्शनात शेतकरी संवाद बैठक घेण्यात आली. या शेतकरी सभेत बियाणे लागवड बाबत चर्चा करण्यात आली. भेसळ युक्त बियाणे, निकष दर्जाचे फवारणी औषध, सोबतच तण न मरणारे तणनाशक याबाबत चर्चा करण्यात आली. तसेच सरकारच्या महाडीबीटी वर असलेल्या योजना बाबत नेहमी सर्व्हर डाउन कार्यक्रम बाबत मुद्दे मांडण्यात आले. त्यानंतर शेतकरी आत्महत्या आणि कर्जमाफी याबाबत काही शेतकरी बांधवांनी माहिती दिली. तसेच या बैठकीमध्ये प्रामुख्याने यावर्षी अतिवृष्टी, महापूर व सततच्या पावसाने शेतकऱ्यांच्या पिकांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले असून सरकारने दिलेली मदत तुटपुंजी जाहीर करून शेतकऱ्यांची एक प्रकारे थट्टा करत आहे. सरसकट अनुदान देऊन शेतकरी बांधवाच्या खात्यावर फक्त ७ हजार रुपये येत आहे. सरकारने काढलेल्या सत्य आणि असत्य सरकारी जी.आर. चे वाचन करून चर्चा करण्यात आली. जी.आर प्रमाणे मिळणारी मदत तुटपुंजी असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने हेक्टरी जिरायती शेती करता पन्नास हजार रुपये व बागायतदार शेतकऱ्यांना हेक्टरी ७५ हजार रुपये ही किमान मदत मिळायला पाहिजे होती याबाबत शेतकरी न्याय हक्क विचार मंचाच्या वतीने अनेकदा निवेदन व आंदोलन करण्यात आले .तरीसुद्धा सरकारने तुटपुंजी मदत दिल्याने तहसीलदार साहेब तिवसा यांना निवेदन देऊन काही दिवसांच्या आत जर का या प्रकारची मदत मिळाली नाही तर शेतकरी न्याय हक्क विचार मंच आंदोलन करेल अशा प्रकारचा निर्णय संवाद बैठकीमध्ये घेण्यात आला. या बैठकीला शेतकरी न्याय हक्क विचार मंचाचे अध्यक्ष दिनेश वानखेडे, दिलीपसिंह नहाटे, संत्रा उत्पादक महासंघाचे तालुका अध्यक्ष सोपानरावजी जीरापुरे, न्याय हक्क विचार मंचाचे समन्वयक संजय टेकाळे, समन्वयक संजय मोरे, अशोकराव पाटील, विनोद जाधव, नंदूभाऊ जीरापुरे, प्रकाश बडकस, तुकाराम चव्हाण, सभेचे अध्यक्ष श्री गजानन सुने, गजानन ठोंबरे, संतोष भैसे, गजानन दारोकार, नंदू जीरापुरे, राजुभाऊ बाभूळकर, राजेश बिंड, स्वप्नील पवार, पत्रकार नितीन पवार, धर्मेंद्र कुरळकर, सतीश डहाके, अशोक दरणे, नितीन वरठी, उमेश दारोकार, संजय दारोकार, चंद्रकांत माहुले, पुंडलिक दारोकार, प्रमोद दारोकार, प्रदीप दमाये, आशिष बंगरे, किरण बंगरे, गणेश चिरडे, इतर शेतकरी उपस्थित होते. सेंद्रिय शेती अभ्यासक निखिल तेटू यांनी शेतकऱ्यांच्या पिकाची उत्पादनक्षमता कशी वाढावी याबद्दल मार्गदर्शन करून आभार प्रदर्शन केले. या बैठकीच आयोजन अशोक दरणे, सतीश डहाके, प्रदीप भाऊ ठोंबरे, दिनेश बाखडे यांनी यशस्वी केले. या शेतकरी संवाद बैठकीला शेकडोच्या संख्येने बुद्धिजीवी शेतकरी उपस्थित होते.

# वलगाव चांदूरबाजार महामार्गावर असलेल्या सुकलेल्या निंबाच्या झाडांना भीषण आग




**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१वलगाव**

अमरावती जिल्ह्यातील वलगाव चांदूरबाजार महामार्गावर असलेल्या नया अकोला गावातील महामार्गाच्या बाजूला असलेल्या निंबाच्या झाडांना अज्ञात व्यक्तीने दिनांक एकोणवीस ऑक्टोंबर रविवार रोजी दुपारी तीनच्या सुमारास अज्ञात व्यक्तीने निंबाच्या झाडांना आग लावली आहे ही सर्व घटना वलगाव चांदूरबाजार महामार्गाने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना माहित पडतात त्यांनी लगेच अमरावती येथील अग्निशामक दलाला माहिती दिली अग्निशामक दलाच्या जवानांना घटना माहित पडतात घटनेचं गांभीर्य लक्षात घेता तात्काळ आपल्या ताफ्यासह घटनास्थळी पोहोचले व निंबाच्या झाडांना लागलेल्या आगीवर पाण्याचा मोठा मारा करून हि आग आटोक्यात आणली आहे ही आग इतकी भीषण होती की वलगाव चांदूरबाजार महामार्गाने प्रवास करणाऱ्या अनेक दुचाकी चालकांना व चारचाकी चालकांना आगीचा फटका बसला आहे निंबाच्या झाडाला लागलेल्या आगीमुळे वलगाव चांदूरबाजार महामार्गावर असलेल्या नया अकोला गावाजवळ एक तास वाहतूक देखील खोळंबली होती अशातच वलगाव चांदूरबाजार महामार्गावर मोठ्या प्रमाणात सुकलेली निंबाची झाडे आहे आता मात्र ही सुकलेली निंबाची झाडे वाहन चालकांसाठी धोकादायक ठरत आहे सुकलेल्या निंबाच्या झाडांना अज्ञात व्यक्ती आग लावत आहे व झाड खाली पडल्यानंतर त्या झाडाचे इंधन बाजारात विकण्यासाठी नेत आहे या संपूर्ण घटनेवर संबंधित विभागाचे अधिकारी लक्ष देतील का व चांदूरबाजार महामार्गावर असलेले सुकलेले निंबाचे झाडे तोडतील का हे पाहणं देखील महत्त्वाचं महत्त्वाचं ठरणार आहे अग्निशामक दलाच्या जवानांनी वेळीच घटनास्थळी पोहोचून ही आग आटोक्यात आणली आहे व ही आग कोणी लावली याचा शोध अग्निशामक दलाचे जवान घेत आहे.

# शुभम तिप्पट असिस्टंट जिओलॉजिस्ट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अमरावती**



महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत शासनाच्या ग्राउंड वॉटर सर्व्हे अॅण्ड डेव्हलपमेंट एजन्सी (जीएसडीए) येथे शुभम लता अतुल तिप्पट यांची असिस्टंट जिओलॉजिस्ट पदासाठी निवड झाली आहे.

शुभमचे शालेय शिक्षण अस्मिता प्राथमिक शाळेत झाले. बारावीपर्यंतचे मणिबाई हायस्कूलमध्ये झाले. महाविद्यालयीन शिक्षण हे चिखलदरा येथील सिपना महाविद्यालयात व एम.एस्सी भुगर्भशास्त्र छत्रपती संभाजी नगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ झाले. त्यानंतर नेट व सेट या दोन्ही परीक्षा उत्तीर्ण केल्या. संशोधनासाठी आआयटीआयएएन खडगपूर कलकत्ता येथे शोध कार्य पूर्ण केले. त्याच दरम्यान युपीएससी मेन्स उत्तीर्ण केली. शुभमने जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमातून हे यश मिळविले आहे. कुटुंबाच्या संपूर्ण सहकार्य त्याला पदोपदी लाभले आहे. शुभमच्या उल्लेखनीय कामगिरीचे सर्वत कौतुक होत आहे. अमरावती विद्यापीठाचे सिनेट सदस्यसुनील तिप्पट व संगीता तिप्पट शुभचे अभिनंदन केले आहे.

# ऑफर्स, सवलतींचा वर्षाव; दुकानांत ग्राहकांची झुंबड पारंपरिक, इलेक्ट्रॉनिक वस्तूंना मोठी मागणी

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अमरावती**

दिवाळीनिमित्त अमरावती जिल्ह्यात सर्वत्र मंगलमय वातावरण आणि उत्साह दिसून येत आहे. शहराच्या विविध ठिकाणच्या प्रमुख बाजारपेठांमध्ये रविवारी खरेदीसाठी ग्राहकांची अक्षरशः झुंबड उडाल्याचे पाहायला मिळाले. दुकानदारांनी दिलेल्या विविध सवलती आणि भेटवस्तूंच्या आकर्षक ऑफर्सचा त्यांनी लाभ घेतला.

यंदा पारंपरिक आणि आधुनिकतेचा संगम असलेल्या भेट वस्तूंचा ट्रेंड आहे. पर्यावरणपूरक वस्तूंना प्रचंड मागणी असून मातीचे दिवे, मातीच्या मूर्ती, सुगंधी कँडेल्स, सजावटीच्या वस्तूंना मागणी वाढली आहे. हस्तकलेच्या वस्तूंसह स्मार्टवॉच, ब्लू टूथ स्पीकर, स्मार्ट-लॅम्प, मोबाइल, टॅब यांची खरेदी झाल्याने बाजारात मोठी उलाढाल झाल्याचे व्यापाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते.

खरेदी करताना यंदा अनेकांनी पारंपरिकतेसोबत आधुनिकता, पर्यावरणपूरकता आणि स्थानिक उद्योगांना साथ देण्याचा विचार केल्याचे दिसून आले.

**ऑनलाइन खरेदीत वाढ**

ऑनलाइन प्लॅटफॉर्मवरही विविध वस्तूंवर मोठी सवलत मिळत असल्याने ऑनलाइन खरेदीचे प्रमाण वाढले आहे. विशेषतः इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंची मागणी वाढली आहे. विविध कंपन्यांनी आकर्षक सवलती दिल्याने त्याचा लाभ ग्राहक घेत आहेत. ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर कस्टमाइज्ड आणि वेलनेस हॅम्पर्सची मोठी विक्री होत आहे. वैयक्तिक फोटो, नाव किंवा संदेश असलेले 'पर्सनलायझ्ड गिफ्ट्स', तसेच हर्बल प्रॉडक्ट्स आणि स्पा किट्स यांना मोठी मागणी आहे.





आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत